,

ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
## नाशिक -४२२ २२२

### सहयोग व विशेष उपक्रम केंद्र

## (C149) मधुमक्षिकापालन प्रमाणपत्र अभ्यासक्रम
## Certificate Programme in Beekeeping

### शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

शैक्षणिक वर्ष:2020-2021

# अनुक्रमणिका

१ केंद्राचा परिचय ........................................................................................ ३

२ शिक्षणक्रमाविषयी........................................................................................ ४

२.१ शिक्षणक्रमाची गरज
२.२ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे
२.३ शिक्षणक्रमाची संरचना
२.४अध्ययन पद्धती
२.५ कालावधी
२.६ माध्यम
२.७ श्रेयांक

३ मधुमक्षिकापालन प्रमाणपत्र शिक्षणक्रम ................................................................७

३.१ अभ्यासक्रम
३.२ प्रवेश पात्रता
३.३ शिक्षणक्रम शुल्क
३.४ मूल्यमापन प्रक्रिया

४ नोंदणी प्रक्रिया ........................................................................................९

५ संपर्कसत्र आराखडा ..................................................................................१०

६ विभागीय केंद्रे ........................................................................................ १४

७ विशेष सूचना ........................................................................................ १५

# विद्यापीठाचा परिचय

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना शासनाच्या २० व्या कलमान्वे १ जुलै १९८९ साली करण्यात आली.

सामान्य माणसापर्यंत उच्च,तंत्र आणि व्यवसायिक शिक्षण पोहचविणे. त्यासाठी दूरशिक्षण आणि अत्याधुनिक संज्ञापन तंत्रज्ञानाचा वापर करून नवनवीन उपक्रमांद्वारे जास्तीत जास्त लोकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे व विद्यापीठला लोक विद्यापीठाचा दर्जा प्राप्त करून देणे असा आहे. विद्यापीठाचे ब्रीदवाक्य 'ज्ञानगंगा घरोघरी' आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य असून या विद्यापीठाची ८ विभागीय केंद्रे अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, कोल्हापूर आणि नांदेड या ठिकाणी कार्यरत आहे. या विद्यापीठाची २००० पेक्षा जास्त अभ्यासकेंद्र असून दरवर्षी साधारणपणे ६.५० लाख विद्यार्थी मुक्त विद्यापीठाचा फायदा घेत आहे. विद्यापीठ शेतकरी, सेनादल, पोलीस, बंदिवान, घरकामगार, दिव्यांग, सफाई कामगार, औद्योगिक कामगार, सुरक्षा रक्षकांसाठी विशेष उपक्रम राबवीत आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा जगातील मेगा युनिवर्सच्या यादीत समावेश असून या विद्यापीठाला असोशिएशन ऑफ कॉमनवेल्थ युनिवर्सिटी या संस्थेकडून सन २०१९ मध्ये 'क्वॉलिटी ऑफ लाईफ' हे प्रतिष्ठेचे पारितोषिक प्राप्त झाले आहे. तसेच २००२ मध्ये 'ॲवार्ड ऑफ एक्सलन्स डिस्टन्स लर्निंग एक्सपिरिअन्स' हे पारितोषिक कॉमनवेल्थ ऑफ लर्निंग कॅनडा या संस्थेतर्फे देण्यात आलेला आहे.

# १. केंद्राचा परिचय

## सहयोग व विशेष उपक्रम केंद्र

सहयोग व विशेष उपक्रम केंद्राची स्थापना व्यवस्थापन मंडळाच्या ठरावानुसार डिसेंबर २०१० मध्ये करण्यात आली. शिक्षणापासून वंचित विशेष लक्ष्यगटांसाठी सामान्य, तांत्रिक, व्यावसायिक आणि रोजगार भिमुख शिक्षणक्रम उपलब्ध करून देणे, तसेच विशेष लक्ष्यगटांकडे आत्मसात असलेली कौशल्ये तपासून प्रमाणित करून certify करणे. या सहयोग उद्देशाने व विशेष उपक्रम केंद्राची स्थापना करण्यात आली.

सहयोग व विशेष उपक्रम केंद्राने रस्ते परिवहन व सुरक्षा प्रमाणपत्र शिक्षणक्रम, ग्राम रोजगार सेवक प्रमाणपत्र शिक्षणक्रम, सुरक्षा रक्षक प्रमाणपत्र शिक्षणक्रम, शेतकरी उत्पादक कंपनी व्यवस्थापन प्रमाणपत्र शिक्षणक्रम, मधुमक्षिकापालन प्रमाणपत्र शिक्षणक्रम असे व्यवसाय व रोजगारभिमुख शिक्षणक्रम विकसित केलेले आहे.

# २ शिक्षणक्रमाविषयी

या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून सर्वसाधारण शेतकरी, आदिवासी ग्रामीण युवक, युवती, महिला व बेरोजगारांना मधमाशीपालना विषयाची सविस्तर शास्त्रीय माहिती मिळेल. कृषी व वन क्षेत्रात कार्यरत असणारा अधिकारी वर्ग, कौशल्य कामगार व शेतकरी यांना मधमाशी पालनाची संकल्पना, कार्यप्रणाली व सेवा सुविधा, आर्थिक व्यवस्थापन, समस्या व उपाय योजना या बद्दल माहिती प्राप्त होईल. त्याशिवाय कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी मधमाश्यांचे महत्त्व यासंबंधी विशेष माहिती मिळेल. हा शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर स्वयंरोजगारातून आर्थिक विकास साध्य करून घेता येतो त्या संबंधी माहिती मिळेल.

## २.१ शिक्षणक्रमाची गरज

- आर्थिक व्यवस्थेतून मोठ्या प्रमाणात फायदा होण्यासाठी शेतकऱ्यांच्या एकत्रीकरणाची गरज आहे. पिकांच्या परागीकरणासाठी मधमाशीपालनाची गरज व त्यातून पीक उत्पादनात वाढ ही संकल्पना रुजवता येईल. त्यामुळे मधुमक्षिकापालन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा उपयोग शेतकरी वर्गास होणार आहे.
- मधमाशी पालन हा शेतीपूरक व्यवसाय आहे व कृषी विकासात पाळीव मधमाश्यांची कशी गरज आहे हा संदेश पोहचविता येईल.
- शेतकऱ्याने आपल्या शेतात मधमाशी पालन करून जास्तीत जास्त पीक उत्पन्न मिळवता येते व मधही प्राप्त करून घेता येते हे मधुमक्षिकापालन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या माध्यमातून ज्ञान प्राप्त करून घेता येईल.
- या शिक्षणक्रमाच्या माध्यमातून राज्यातील सर्व शेतकऱ्यांना मधमाश्यापालनाचे कौशल्य प्राप्त करून घेता येईल. अधिकाधिक शेतकऱ्यांनी हा शिक्षणक्रम पूर्ण केल्यास त्यांच्या उत्पन्नात निश्चितच वाढ होण्यास मदत होईल व कृषी मालाची प्रतवारी त्यांना चांगली प्राप्त होईल .
- बेरोजगार व भूमिहीन आदिवासी बांधवानी मधुमक्षिकापालन अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर मध उद्योगातून आर्थिक प्राप्ती करू शकतील.

## २.२. शिक्षणक्रमाची सर्वसाधारण उद्दिष्टे

- नवीन पिढीला मधमाशी पालनाचे महत्त्व समजून देण्यासाठी या शिक्षणक्रमाचा उपयोग होईल.
- पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मधुमक्षिकापालन या शिक्षणक्रमाची मदत होईल.
- पीक उत्पादनात मधमाशी पालन हा घटक समाविष्ट करून घेतल्यास कृषी उत्पादकतेत वाढ हे उद्दिष्ट साध्य करणे शक्य होणार आहे व पुढील हरितक्रांतीचे स्वप्न साकारता येईल.
- मधमाशीपालनाचे कौशल्य प्राप्त करून मध उद्योगातून मधुक्रांतीचे स्वप्नही साकारता येईल.
- मधमाशीपालन व्यवसाय पर्यावरणस्नेही असल्यामुळे पर्यावरण विकासाबरोबर आर्थिक विकासही घडवून आणता येईल.

## २.३. शिक्षणक्रमाची संरचना

### (मधुमक्षिकापालन प्रमाणपत्र शिक्षणक्रम - C149)

मधुमक्षिकापालन प्रमाणपत्र शिक्षणक्रमातील अभ्यासक्रमाची मांडणी पुढीलप्रमाणे करण्यात आलीआहे.

| सांकेतांक | अभ्यासक्रम | श्रेयांक |
|---|---|---|
| GEN171 | मधुमक्षिकापालन प्रमाणपत्र अभ्यासक्रम – पाठ्यपुस्तिका | ६ |
| GEN172 | मधुमक्षिकापालन प्रमाणपत्र अभ्यासक्रम – कार्यपुस्तिका | २ |

## २.४. अध्ययनपद्धती

ज्या विद्यार्थ्यांना दररोज महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेता येत नाही तसेच अध्ययन करण्यासाठी पूर्ण वेळ देता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठाने स्वतंत्रपणे अध्ययन पद्धती विकसित केली आहे. त्यात पुढील घटकांचा समावेश आहे.

१. स्वयं-अध्ययनाधिष्ठित इ. पुस्तके.
२. तज्ज्ञ प्राध्यापकांचे संपर्कसत्रात मार्गदर्शन
३. अध्ययन कालांतर्गत मूल्यमापनाची सोय
४. आवश्यक तेथे प्रात्यक्षिकांची संधी
५. आभासी वर्गाची (Virtual Class Room) वेब रेडिओ यशवाणी उपलब्धता
६. दृकश्राव्य केंद्र

या अध्ययन पद्धतीत विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमाचा तपशील न देता, त्यावरील अध्ययन पुस्तकांचा संच E-Book स्वरुपात देण्यात येतो. प्रवेश शुल्कातच ही अध्ययन पुस्तके देण्यात येतात व ती विद्यार्थ्याला स्वतःकडे कायम ठेवता येतात. ही स्वयं-अध्ययन E-Book पुस्तके अन्य पाठ्यपुस्तकांपेक्षा निराळ्या पद्धतीने लिहिलेली असतात. ह्या पाठ्यपुस्तकात एका वाचनात समजावून घेता येईल, अशा प्रकारे विषयांची छोट्या छोट्या घटकांत विभागणी केलेली असते. उदा. उदाहरणे, आलेख, चित्रे, इत्यांदीच्या सहाय्याने विषयांची मांडणी सुबोधपणे करण्यात येते. ह्या पुस्तकांची छपाई विद्यार्थ्याचे अध्ययन सुलभपणे व्हावे या दृष्टीने करण्यात आलेली असते. जर त्याला काही प्रश्न सोडविता आले नाही, तर त्याने पुन्हा तो भाग पुन्हा वाचून उत्तरे मिळवावयाची असतात. एवढे करूनही काही प्रश्नांची उत्तरे मिळू शकले नाहीत, तर ते प्रश्न नोंदवून ठेवावेत व अभ्यासकेंद्रावरील संपर्क सत्रात मार्गदर्शक प्राध्यापकांशी (समंत्रक-Counsellor) चर्चा करून त्याची उत्तरे मिळविता येतात. विद्यार्थ्याला आपल्या सोयीच्या ठिकाणचे अभ्यासकेंद्र निवडता येते. या अभ्यासकेंद्रावर प्रत्येक अभ्यासक्रमासाठी सामान्यत: सुटीच्या दिवशी वा कार्यालीन वेळेनंतर संपर्कसत्रे घेण्यात येतात त्या-त्या विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शक ह्या संपर्कसत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. मात्र हे मार्गदर्शन केवळ व्याख्यानांच्या स्वरूपाचे असत नाही. मार्गदर्शकाकडून विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची/शंकांची उत्तरे मिळविणे, कठीण विषयावर चर्चा-परिसंवाद घडवून आणणे, अंतर्गत मुल्यमापनाच्या माध्यमातून आपल्या प्रगतीविषयी विद्यार्थ्याला माहिती घेता येते. म्हणून संपर्कसत्रांना विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे.

विद्यार्थ्याने वरील सर्व अध्ययन सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन स्वतः ची अभ्यास पद्धती तयार करावी. आपल्याला मिळणारा वेळ लक्षात घेऊन मिळणाऱ्या वेळेचा नियोजनपूर्वक उपयोग करावा. केवळ पाठांतराद्वारे केलेला अभ्यास हा खरा अभ्यास नसून विषयांचे सुस्पष्ट आकलन होणे व त्याचा योग्य ठिकाणी उपयोग करता येणे हे चांगल्या अभ्यास पद्धतीचे मर्म आहे. त्यामुळे प्रात्यक्षिके व सराव यांवर भर देऊन विद्यार्थ्याने अभ्यास करावा अशी अपेक्षा आहे. अभ्यास केंद्रावर कौशल्यावर आधारित प्रात्यक्षिकांचे आयोजन केले जाते.

## २.५. कालावधी

हा शिक्षणक्रम ६ महिने कालावधीचा आहे. परंतु जास्तीत जास्त २ वर्षात पूर्ण करता येईल. २ वर्षानंतर नोंदणी संपुष्टात येईल.

## २.६. माध्यम

सदर अभ्यासक्रम हा मराठी माध्यमामध्ये उपलब्ध राहील.

## २.७. श्रेयांक

सामान्यतः एका अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याला ३० ते ३५ घड्याळी तासांचा वेळ लागतो. मुक्त शिक्षणपद्धतीत या अध्ययनतासांचे मापन 'श्रेयांका' च्या परिमाणात केले जाते. ३० ते ३५ अध्ययनतासांचा अभ्यास म्हणजे १ श्रेयांक. या अभ्यासात अध्ययन पुस्तकांचे वाचन, टिपणे काढणे, मनन-चिंतन करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, संपर्कसत्रातील मार्गदर्शन, इत्यादींचा समावेश आहे.

आठ श्रेयांकांचा म्हणजेच २०० ते २२५ अध्ययन तासांचा एक अभ्यासक्रम असतो. मधुमक्षिका पालन प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी एकूण ८ श्रेयांकांचा अभ्यास पूर्ण करावा लागतो. ६ श्रेयांकाचा बौद्धिक व २ श्रेयांकाचा प्रात्यक्षिक पूर्ण करावा लागतो.

# ३. मधुमक्षिकापालन प्रमाणपत्र अभ्यासक्रम (C149)

### ३.१ अभ्यासक्रम

**पाठ्यपुस्तिका (GEN171)**

| | |
|---|---|
| घटक क्र- १ | मधमाश्यांच्या प्रमुख प्रजाती व जीवनपद्धती |
| घटक क्र- २ | मधुमक्षिकापालनासाठी लागणारे आवश्यक साहित्य व तांत्रिक माहिती |
| घटक क्र- ३ | फुलोरा स्त्रोत दर्शिकेच्या अभ्यासातून मध उद्योग विकास |
| घटक क्र- ४ | फुलातील मकरंदापासून मधनिर्मिती व मधाचे प्रकार |
| घटक क्र- ५ | पर्यावरण साक्षरतेतून मधमाश्यांचे संवर्धन व संगोपन |
| घटक क्र- ६ | भरघोस व दर्जेदार कृषी उत्पादनासाठी मधुमक्षिकापालन |
| घटक क्र- ७ | आग्या मधमाशी संवर्धनातून सदाहरित मधुक्रांती |
| घटक क्र- ८ | मधमाशी-वनस्पती सहजीवनातून मध उद्योग विकास |
| घटक क्र- ९ | मधमाश्यांचे रोग, शत्रू व त्यावरील उपाय |
| घटक क्र- १० | देश-विदेशातील मधमाश्यापालन |

## कार्यपुस्तिका (GEN172)

| | |
|---|---|
| प्रात्यक्षिक क्र- १ | मधमाश्यांच्या प्रमुख प्रजातींचा तुलनात्मक अभ्यास |
| प्रात्यक्षिक क्र- २ | कामकरी व नर मधमाशी यांची बाह्यरचना व त्यांच्या कार्याचा परिचय करून घेणे |
| प्रात्यक्षिक क्र- ३ | मधमाशी जीवनक्रम अभ्यासणे |
| प्रात्यक्षिक क्र- ४ | मधुमक्षिकापालनासाठी लागणाऱ्या साहित्याची ओळख व उपयुक्तता अभ्यासणे |
| प्रात्यक्षिक क्र- ५ | मधमाश्यांच्या वसाहतींचे निरीक्षण करतांना घ्यावयाची दक्षता |
| प्रात्यक्षिक क्र- ६ | मधुबनातील निरीक्षणांच्या नोंदी व त्यानुसार कार्यवाही |
| प्रात्यक्षिक क्र- ७ | वसाहत विभाजनाचे तंत्र अभ्यासणे |
| प्रात्यक्षिक क्र- ८ | मध उद्योग निर्मित उत्पादने प्राप्त करून घेण्याचे तंत्र |
| प्रात्यक्षिक क्र- ९ | मधपेट्यांचे स्थलांतर करतांना घ्यावयाची काळजी |
| प्रात्यक्षिक क्र- १० | पाळीव मधमाश्यांसाठी पूरक आहाराचे महत्त्व |
| प्रात्यक्षिक क्र- ११ | पीक परागीकरणासाठी मधपेट्या स्थापीत केल्यानंतर येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय |

## ३.२. प्रवेश पात्रता

- १० वी उत्तीर्ण किंवा मुक्त विद्यापीठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण
- वयाची १८ वर्षे पूर्ण

## ३.३. शिक्षणक्रम शुल्क

| |
|---|
| विद्यापीठ शुल्क : रु.९००/-<br>(ऑनलाईन)<br>अभ्यासकेंद्र शुल्क : रु. ६००/-<br>(अभ्यासकेंद्रावर भरावे) |
| एकूण शिक्षणक्रम : रु. १५००/- |

**मधुमक्षिकापालन प्रमाणपत्र शिक्षणक्रम शुल्क विवरण तक्ता**

| अ. क्र. | शुल्काचे शीर्षक | शुल्क |
|---|---|---|
| **(A)** | **मुक्त विद्यापीठ हिस्सा** | **९००** |
| 1 | शिक्षणक्रम नोंदणी शुल्क | १०० |
| 2 | शैक्षणिक शुल्क | ४०० |
| 3 | परीक्षा/ मूल्यमापन व प्रमाणपत्र | ३०० |
| 4 | केंद्र विकसन व परिरक्षण | १०० |
| | | |
| **(B)** | **अभ्यासकेंद्राचा हिस्सा** | **६००** |
| 1 | अभ्यासकेंद्र प्रमुख | १०० |
| 2 | संयोजक | १०० |
| 3 | मार्गदर्शक प्राध्यापक | २५० |
| 4 | सहाय्यक | ७५ |
| 5 | शिपाई | ५० |
| 6 | अभ्यासकेंद्रासाठी जागा वर्ग खोल्या, संगणक, इंटरनेट, किरकोळ खरेदी, स्टडी सेंटर, किरकोळ खर्च , आदर, आतिथ्य | २५ |
| | **एकूण शुल्क रु.** | **१५००** |

## ३.४ पुनर्नोंदणी

४.१. मधुमक्षिकापालन प्रमाणपत्र शिक्षणक्रम ६ महिने कालावधी आहे. परंतु सदर शिक्षणक्रम जास्तीत जास्त २ वर्षात पूर्ण करता येईल.

४.२ प्रक्रिया

- नोंदणीची मुदत संपल्यानंतर विद्यापीठ शुल्क भरून परत नोंदणी करता येईल.
- पुनर्नोंदणी फी ९००/- रु. प्रत्येक बौद्धिक आणि प्रात्यक्षिक अभ्यासक्रमासाठी शुल्क रु. १५०/- एवढ्या रकमेचे चलन बँकेत भरावे.

## ३.५ मूल्यमापन प्रक्रिया

| संकेतांक | शिक्षणक्रम | श्रेयांक | परीक्षा | किमान | कमाल | बौद्धिक/ प्रात्यक्षिक | किमान | कमाल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| GEN171 | मधुमक्षिकापालन प्रमाणपत्र शिक्षणक्रम | २ | अंतिम परीक्षा | ४० | १०० | अंतिम परीक्षा | ३२ | ८० |
| | | | | | | अंतर्गत | ८ | २० |
| GEN172 | | ६ | प्रात्यक्षिक | - | ५० | बहिस्थ | १७ | ५० |

शिक्षणक्रम उत्तीर्ण होण्यासाठी बौद्धिक परीक्षेमध्ये १०० पैकी ४० गुण आणि प्रात्यक्षिक परीक्षेमध्ये ५० पैकी १७ गुण स्वतंत्रपणे मिळवणे आवश्यक आहे. अंतिम परीक्षेच्या निकालासाठी अंतर्गत आणि बहिस्थ दोन्ही परीक्षांचे एकत्रित गुण धरले जातील.

# ४. नोंदणी प्रक्रिया

१) विद्यार्थ्यांनी  विद्यापीठाने निर्धारित केलेल्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेप्रमाणे नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी.

२) ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मिळालेली पावती अभ्यासकेंद्रावर दाखवून आपला प्रवेश निश्चित करावी.

३) nondani@ycmou.digitaluniversity.ac

४) प्रवेशासाठी  प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

५) विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया **१ जानेवारी ते १५ जानेवारी २०२१** पर्यंत सुरु राहील.

# संपर्कसत्र आराखडा
# C-149 मधुमक्षिकापालन प्रमाणपत्र शिक्षणक्रम

| संपर्कसत्र क्र. | दिनांक | वार | वेळ | संपर्कसत्र |
|---|---|---|---|---|
| 1 | 14/2/2021 | रविवार | 11.00 ते 2.00 | प्रथम संपर्क सत्राचे उद्घाटन आपल्या परिसरातील मान्यवरांच्या हस्ते, मान्यवरांच्या हस्ते अभ्यासकेंद्र फलकाचे उद्घाटन. मुक्त विद्यापीठ म्हणजे काय? याविषयी माहिती देणे. मुक्त शिक्षण पद्धत, पारंपारिक आणि मुक्त शिक्षणपद्धतीतील फरक, परीक्षा पद्धत, संपर्कासात्र म्हणजे काय? याविषयी महिती देणे. आयोजक आणि विद्यार्थ्यांना संपर्कसत्र आराखड्याचे वितरण, ई बुक डाउनलोड करण्याबाबत मार्गदर्शन (एकापेक्षा अधिक शिक्षणक्रम असल्यास प्रथम संपर्कासत्र सगळ्यांसाठी समान असेल ) |
| 2 | 21/2/2021 | रविवार | 11.00 ते 12.30 (बौध्दिक) | मधमाश्यांच्या प्रमुख प्रजाती त्यांची जैविक वैशिष्ट्ये व उपयुक्तता, सातेरी जातीच्या वसाहतीतील विविध घटकांची माहिती, कामानुसार कामकरी मधमाश्यांचे वर्गीकरण. |
| | | | 12.30 ते 2.00 (प्रात्यक्षिक) | मधमाश्यांच्या प्रमुख प्रजातींचा तुलनात्मक अभ्यास |
| 3 | 28/2/2021 | रविवार | 11.00 ते 12.30 (बौध्दिक) | मधमाशीपालनसाठी लागणाऱ्या साहित्यांचा अभ्यास, निसर्गातील सातेरी मधमाश्यांच्या वसाहती पकडण्याचे कौशल्यांचा अभ्यास, वसाहतींची तपासणी आणि निगा कशी ठेवावी त्याचा अभ्यास, वसाहतींचे विभाजन पध्दतीचा अभ्यास, तातडीची व कृत्रिम राणी मधमाशीच्या पैदाशीचा अभ्यास. |
| | | | 12.30 ते 2.00 (प्रात्यक्षिक) | राणीबाह्यरचना व त्यांच्या कार्याचा कामकरी व नर मधमाशी यांची परिचय करून घेणे |
| 4 | 7/3/2021 | रविवार | 11.00 ते 12.30(बौध्दिक) | फुलोऱ्याचा अभ्यास हा मध उद्योग विकासासाठी कसा आवश्यकआहे याचा अभ्यास, पाळीव मधमाश्यांपासून आर्थिक लाभ कसा होतो याविषयी माहिती. |
| | | | 12.30 ते 2.00 (प्रात्यक्षिक) | मधमाशी जीवनक्रम अभ्यास |
| 5 | 14/3/2021 | रविवार | 11.00 ते 12.30 (बौध्दिक) | फुलांतील मकरंदापासून शुद्ध मधनिर्मितीचा अभ्यास, पाळीव मधमाश्यांपासून मध काढण्याची पद्धती अभ्यास, मधाचे प्रकार व मधाचे प्रमुख स्रोताचा अभ्यास, सदाहरित मधुक्रांती आणि त्यासाठी मधमाश्यांचे महत्त्व अभ्यास, जंगली मधमाश्यांच्या संवर्धनासाठी मधुसाक्षरतेची गरज |
| | | | 12.30 ते 2.00 (प्रात्यक्षिक) | मधुमक्षिकापालनासाठी लागणाऱ्या साहित्याची ओळख व उपयुक्तता अभ्यासण |
| 6 | 21/3/2021 | रविवार | 11.00 ते 12.30 (बौध्दिक) | परागीकरण पिकांची गरज शास्त्रीय अभ्यास माहिती, मधमाश्यापालनातून भरघोस पीक उत्पादन अभ्यास, मधमाश्यांचे अस्तित्व धोक्यात कसे? हा अभ्यास, पाळीव मधमाश्यांशिवाय शेती व्यवसाय तोट्याचा, मधमाशी विकास कार्यक्रम |
| | | | 12.30 ते 2.00 (प्रात्यक्षिक) | मधमाश्यांच्या वसाहतींचे निरीक्षण करतांना घ्यावयची दक्षता - अभ्यास |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | 28/3/2021 | रविवार | 11.00 ते 12.30 (बौध्दिक) | परागीकरण पीक संजीवक-कसे? शास्त्रीय माहिती घेणे, मधमाश्यापालन व्यवसायाला पूरक परिस्थिती अभ्यास, पाळीव मधमाश्या व पीक उत्पादनातील वाढ अभ्यास, व्यावसायिक पिकांत मधमाश्यांचे महत्त्व समजावून घेणे, मधुवनस्पतींच्या फुलोऱ्याचा काळ समजावून घेणे |
| | | | 12.30 ते 2.00 (प्रात्यक्षिक) | मधुबनातील निरीक्षणांच्या नोंदी व त्यानुसार कार्यवाही समजावून घेणे |
| 8 | 4/4/2021 | रविवार | 11.00 ते 12.30 (बौध्दिक) | पर्यावरणस्नेही मधमाशी शास्त्रीय माहिती, अमृततुल्य मधाचा लाभ, मधमाशी शत्रू नसून मित्र-उदाहरणासहित समजावून सांगणे, कृषी संजीवक मधमाशी, मधमाशीच्या डंखापासून बचाव, मध काढण्याची शास्त्रीय पद्धतीचा अभ्यास. |
| | | | 12.30 ते 2.00 (प्रात्यक्षिक) | वसाहत विभाजनाचे तंत्र अभ्यास |
| 9 | 11/4/2021 | रविवार | 11.00 ते 12.30 (बौध्दिक) | अंतर्गत चाचणी परीक्षा |
| | | | 12.30 ते 2.00 (प्रात्यक्षिक) | अंतर्गत चाचणी परीक्षा |
| 10 | 18/4/2021 | रविवार | 11.00 ते 12.30 (बौध्दिक) | उपासमार टाळण्यासाठी निसर्गाचा आदर, मधुवनस्पती व पिकांचे महत्त्व, मोहोळांचे संवर्धन व संगोपन, वृक्षलागवड सुखी जीवनाची गुरुकिल्ली, जैवविविधतेतून शाश्वत पर्यावरण विकास, आधुनिकीकरणामुळे मधमाश्यांच्या अस्तित्वाला धोका, वृक्ष लागवडीतून मधमाश्यापालन व्यवसायाचा विकास |
| | | | 12.30 ते 2.00 (प्रात्यक्षिक) | मध उद्योग निर्मित उत्पादने प्राप्त करून घेण्याचे तंत्र अभ्यास |
| 11 | 25/4/2021 | रविवार | 11.00 ते 12.30 (बौध्दिक) | जिवाणूमुळे पिलावळीला होणारे रोग, मानवाच्या हिंसक कृती |
| | | | 12.30 ते 2.00 (प्रात्यक्षिक) | मधपेट्यांचे स्थलांतर करतांना घ्यावयाची काळजी |
| 12 | 2/4/2021 | रविवार | 11.00 ते 12.30 (बौध्दिक) | भारतातील मधमाश्यापालन व्यवसाय अभ्यास, मध उत्पादनाचे प्रमुख स्रोत अभ्यासणे, मधमाशीपालन व्यवसाय विकास मार्गदर्शन, विदेशातील मधमाश्यापालन व्यवसाय अभ्यास |
| | | | 12.30 ते 2.00 (प्रात्यक्षिक) | पाळीव मधमाश्यांसाठी पूरक आहाराचे महत्त्व |
| 13 | 9/5/2021 | रविवार | 11.00 ते 2.00 (प्रात्यक्षिक) | मधुमक्षिका उपक्रमास भेट, पीक परागीकरणासाठी मधपेट्या स्थापित केल्यानंतर येणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय |

आयोजित संपर्कसत्राच्या दिवशी शासकीय सुट्टी किवा सन आल्यास तो अभ्यासक्रम पुढील संपर्कसत्राच्या दिवशी पूर्ण करून घेणे.

# Certificate Programme in Beekeeping (C149)

| Sr. No. | Center Name | Cordinator Name | Address | Email Address & Mobile No | Study Center Code |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Krishi Vigyan Kendra, Nashik | Raosaheb Patil | Yashwantrao Chavan Mahrashtra Open University, Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan Shiwar, Nashik, 422222 | kvknashik@rediffmail.com 9403774654 | 5416A |
| 2 | College of Management, Khamgaon | Prof. Rajkumari Tejendrasingh Chouhan | Behind St. Anns School, Shelgaon (U), Shegaon Road, Khamgaon, 444303 | uddan1122@gmail.com 9970275566 | 1392A |
| 3 | ADV.M.N.DESHMUKH ARTS, SCIENCE AND COMMERCE COLLEGE, RAJUR ,TAL-AKOLE,DIST-A.NAGAR | DR.B.S. DESHMUKH | RAJUR ,TAL-AKOLE,DIST-A.NAGAR | mndcollegerajur@gmail.com 9322323343 | 51214 |
| 4 | Dr Rafiq Zakaria College for women Aurangabad | Dr Maqdoom Farooqui | Navkhanda palace jublee park Bhadkalgate, VIP Rosd, 431001 | collegekalwan@gmail.com 9422711162 | 21257 |
| 5 | NETAJI SUBHASHCHANDRA BOSE COLLEGE OF AGRICULTURE MARKHEL | Dr R S MULE | A/P- MARKHEL, NANDED- BIDAR ROAD, 431718 | nsbagrimarkhel@gmail.com 9923057777 | 85198 |
| 6 | COLLEGE OF AGRICULTURE SELU. | Prof. S.S.Raut | LOKMANGAL NAGAR, RAIGAD CORNER,, PARBHANI ROAD, 431503 | krushimahavidyalaya@gmail.com 8007697263 | 87139 |
| 7 | Dr. Vithalrao Vikhe Patil Foundation's College of Agriculture | Dr. Madhukar Bhimraj Dhonde | Wadgaon Gupta, Viladghat, P.O.- MIDC | vikheagri@gmail.com 8554990246 | 51213 |
| 8 | DR. GANGADHARRAO PATHRIKAR COLLEGE OF AGRICULTURE ,PATHRI | DR.S.R.NAGARGOJE | AT/POST -PATHRI TQ-PHULAMBRI DIST-AURANGABAD, 431111 | gpbscagri2015@gmail.com 9422214198 | 21255 |
| 9 | College of Agriculture, Babhulgaon | Dr. Dineshkumar Pandit Kuldhar | At Babhulgaon Post Bhatgaon Tal Yeola Dist Nashik, Patoda Road, 423401 | principal@abyeola.com 8329567552 | 54392 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 10 | Poojya Sane Guruji Vidya Prasarak Mandal's K. V. Patel College of Agriculture, Shahada. | Dr. Prakash Laxman Patel | Shahada. Dist- Nandurbar., khetia Road,, 425409 | princi_agri@rediffmail.com 7588733233 | 5511A |
| 11 | COLLEGE OF AGRICULTURE AMKHEDA | Dr.PRADIP KUMAR H. ULEMALE | A/P. AMKHEDA TALUKA. MALEGAON DIST. WASHIM, 444503 | collegeofagriamkheda@gmail.com 8605099707 | 1578A |
| 12 | SAU.VASUDHA TAI DESHMUKH KRUSHI TANTRA VIDYALAY | MR SANDIP CHANDRAKANT THAKUR | A/P MUNDGAON TQ AKOT DIST AKOLA, MAINROAD, 444117 | vdkvmundgaon2000@gmail.com 9850371891 | 11134 |
| 13 | SUPRAKRUTI MADHUSHALA BEE ORGANIC FARM | DR. TUKARAM BANDU NIKAM | SUPRAKRUTI MADHUSHALA, GAT NO. 72, GOVARDHAN, VIA YASHWANTRAO CHAVAN MAHARASHATRA OPEN UNIVERSITY NASHIK- 422222 | tbnikam@gmail.com 9420226557 | 54471 |
| 14 | KRISHI VIGYAN KENDRA, TONDAPUR | Dr P.P.Shelke | POST WARANGA TA. KALMNURI DIST HINGOLI, 431701 | kvkhingoli@gmail.com 765390976 | 8806A |
| 15 | MANIKCHAND DHARIWAL INSTITUTE - 6321A | PRIN. NANDKUMAR SHRIRANGRAO NIKAM | SHIRUR, (GHODNADI), TAL- SHIRUR, DIST- PUNE, 412210 | rcpycmou6321a@gmail.com 9822749899 | 6321A |
| 16 | Phaltan Education Societys College of Agriculture, Phaltan | Dr. Sagar Dattatray Nimbalkar | Malojiraje Educational Campus, Jinti Naka Phaltan, 415523 | ssch2003@gmail.com 9423884887 | 64119 |
| 17 | SADGURU COLLEGE OF AGRICULTURE MIRAJGAON | Dr.Ramdas Keru Bite | Nagar Solapur Road (Near Toll Plaza) Mirajgaon, Tal- Karjat Dist-Ahmednagar Pin414401, 414401 | sadguruagri@rediffmail.com 7722053503 | 51147 |
| 18 | Gramonnati Mandal's , College of Agri.Business Management, Narayangaon, Tal - Junnar, Dist- Pune | Dr.Milind Bhimraj Bhujbal | AP- Narayangaon, Tal - Junnar, Dist- Pune, Pune - Nashik Highway, Narayangaon 410504 | maliprashikshan@rediffmail.com 9730804768 | 6222A |
| 19 | Dadasaheb Patil College of Agriculture, Dahegaon | Dr. S. S. Bainade | At. Post. Dahegaon Tal. Vaijapur Dist. Aurangabad | dpcagri99@gmail.com 9765542299 | 21258 |
| 20 | Karmayogi Dulaji Sitaram Patil College of Agriculture | Dr. I. B. Chavan | Udoji Maratha Boarding Campus, Gangapur road, Nashik, 422002 | acn_13@rediffmail.com 8888893586 | 54302 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 21 | Vivekanand Agriculture College Hiwara Ashram | Dr Subhash Pundlik Kalwe | Vivekanand Nagar Hiwara Ashram, Tq Mehkar, Dist Buldana 443301 | vachiwara@gmail.com 9767897310 | 1359A |
| 22 | Department of Zoology | Dr. V. B. Gaikwad | K.R.T. Arts, B. H. Commerce and Science College Shivaji Nagar, Gangapur Road,, 422002 | vikramkakulte@kthmcollege.ac.in 788013209 | 54477 |
| 23 | SHRI DHOKESHWAR COLLEGE | DR. LAXMAN SHRIDHAR MATKAR | TAKAKI DHOKESHWAR ,Tal- PARNER, TAKALI DHOKESHWAR | tdcollege@gmail.com 9011503334 | 51215 |
| 24 | Kalwan Education Societs / Arts, Commerce & Science College Kalwan (Manur) Tal. Kalwan Dist. Nashik | Dr. B. S. Pagar | Arts, Commerce & Science College Kalwan (Manur) Tal. Kalwan Dist. Nashik - 423501, Arts, Commerce & Science College Kalwan (Manur) Tal. Kalwan Dist. Nashik - 423501, 423501 | collegekalwan@gmail.com 8275021923 | 54279 |
| 25 | KRISHI VIGYAN KENDRA PAL TALUKA RAVER DIST JALGAON | SANJAY JANARDAN MAHAJAN | AT POST PAL TAL RAVER DIST JALGAON, 425504 | kvkpal@gmail.com 9420110527 | 5325A |
| 26 | Maulana Azad College of Arts, Science & Commerce | Dr. Mazahar Ahmed Farooqui | Post Box No 27, Dr. Rafiq Zakaria Campus, Rauza Bagh, Aurangabad, 431001 | macprincipal@gmail.com 9422214785 | 21256 |
| 27 | Mata ratneshwari sevabhavi shikshan santha zari's Shri guru govindsinghji mahavidyalay | Dr.Chilpimpare Anil Balajirao | AT zari, post- vishnupuri, 431606 | mrssnanded@gmail.com 9422288518 | 85222 |
| 28 | MADHUSANCHAY FOUNDATION | Rajeev Madhavrao Chandratre | 103- NIPS SKILL INSTITUTE 1ST FLOOR SHIV PLAZA APARTMENT | nipsnasik@gmail.com 9403261226 | 54478 |

# ५. विभागीय केंद्रे

### १. अमरावती
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र दूरध्वनी
क्रमांक.0721-2531444
मुक्त विद्यापीठ, अमरावती प्रादेशिक फॅक्स.
क्रमांक 0721-2531445
केंद्र, व्ही.एम.व्ही. रोड ते वलगाव रोड,
पोस्ट. व्ही.एम.व्ही., अमरावती -444604

### २. औरंगाबाद
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र दूरध्वनी क्रमांक
0240-2335798 /
मुक्त विद्यापीठ, औरंगाबाद प्रादेशिक 2356826
केंद्र, सी / ओ, सर्व्हे क्र. 41, नंदनवन फॅक्स
क्रमांक 0240-2335798
कॉलनी, कॅम्प, औरंगाबाद – 431001

### ३. मुंबई
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र दूरध्वनी क्रमांक
022-23874186 /
मुक्त विद्यापीठ, मुंबई प्रादेशिक 23813256
केंद्र, सी / ओ, जगन्नाथ शंकरशेठ, फॅक्स क्रमांक
022-23826135
प्राथमिक मुन्सिपाल स्कूल, दुसरा मजला,
फ्रीअर ब्रिच (दक्षिण), नाना चौक,
ग्रँट रोड (वेस्ट), मुंबई - 400007.

### ४. नागपूर
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र दूरध्वनी क्रमांक
0712-2553724 / 25
मुक्त विद्यापीठ, नागपूर प्रादेशिक फॅक्स क्रमांक
0712- 2553725
केंद्र, सुभेदार हॉल, विद्यापीठ
क्रीडा क्षेत्र, लॉ कॉलेज कॅम्पस,
अमरावती रोड, रविनगर चौक,
नागपूर - 440001

### ५. नाशिक
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र दूरध्वनी. क्रमांक
0253-2317063
मुक्त विद्यापीठ, नाशिक प्रादेशिक फॅक्स क्रमांक
0253-2576756
केंद्र, जुनी निगम इमारत,
दुसरा मजला, नवीन पंडित कॉलनी, नाशिक –
422002

### ६. पुणे
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र दूरध्वनी क्रमांक
020-24491107
मुक्त विद्यापीठ, पुणे प्रादेशिक केंद्र, फॅक्स क्रमांक
020-24457914
शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशलाग्रहा,
महानगरपालिका शाळा क्रमांक (मुले),
654, विरूद्ध. सदाशिव पेठ हौद,
कुमधेकर मार्ग, पुणे - 4101030

### ७. कोल्हापूर
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र दूरध्वनी .0231-
2607022
मुक्त विद्यापीठ, कोल्हापूर प्रादेशिक फॅक्स
क्रमांक 0231-2607023
सेंटर, शिवाजी युनिव्हर्सिटी कॅम्पस,
पोस्ट ऑफिस जवळ, विद्यानगर,
कोल्हापूर - 416004

### ८. नांदेड
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र दूरध्वनी क्रमांक
02462-259940 / 50
मुक्त विद्यापीठ, नांदेड प्रादेशिक फॅक्स 02462-
259940
केंद्र, सी / ओ, श्रीमती. इंदिरा गांधी
प्राध्यापक महाविद्यालय, लातूर फाटा,
वासरणी रोड, नांदेड- 43116003

# ६. विशेषसूचना / संपर्कासाठी

सहयोग व विशेष उपक्रम केंद्र
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ,
नाशिक -४२२२२२, **दूरध्वनी** : (०२५३) २२३०३३५
**ई-मेल** - ccsi@ycmou.digitaluniversity.ac
**Website**- http://ycmou.digitaluniversity.ac

**प्रा. प्रकाश अतकरे,** प्रमुख, शैक्षणिक व्यवस्थापन,
सहयोग व विशेष उपक्रम केंद्र (CCSI)
**Mo. No:** 9422247286
**E-Mail:** ccsi@ycmou.digitaluniversity.ac

**श्री. कैलास मोरे,** सहयोगी सल्लागार (CCSI)
ग्रामरोजगार सेवक प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C133)
शेतकरी उत्पादक कंपनी व्यवस्थापन प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C148).
**Mo. No:** 9021422479
**E-Mail:** ccsi@ycmou.digitaluniversity.ac

**श्रीमती. माधुरी खर्जुल,** शैक्षणिक संयोजक (CCSI)
सुरक्षा रक्षक प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C132)
सुरक्षा अधिकारी प्रगत प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C134)
**Mo. No:** 8668279088
**E-Mail:** ccsi@ycmou.digitaluniversity.ac

**श्री. राहुल नवले,** शैक्षणिक संयोजक (CCSI)
मधुमक्षिकापालन कौशल्य प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C149)
**Mo. No:** 8999980785
**E-Mail:** ccsi@ycmou.digitaluniversity.ac

**नोंदणीबाबत संपर्कासाठी**
**सहायक कुलसचिव**
नोंदणी कक्ष य.च.म मुक्त विद्यापीठ, नाशिक
**Phone**: (0253) 2230580
**Email**: nondani@ycmou.digitaluniversity.ac
परीक्षेसाठी अभ्यासकेंद्राची यादी विद्यापीठाच्या Website वर उपलब्ध करून देण्यात येईल.
**परीक्षेबाबत संपर्कासाठी**
**सहाय्यक कुलसचिव परीक्षा कक्ष-२**
परीक्षा विभाग य.च.म. मुक्त विद्यापीठ
**Phone**: (0253) 2230058
: 9403774548
**Email**: borse_kb@ycmou.digitalunversity.ac